वनोपजाच्या वाहतूक परवाना शुल्कात सुधारणा करण्याबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१६/प्र.क्र.५६/फ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २४ ऑगस्ट, २०१६.

वाचा :-

१) शासन निर्णय क्र.टिआरएस-१०००/प्र.क्र.३३८/फ-३, दिनांक २२.०२.२००१.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२५/मालकी/प्र.क्र.२०४/१५-१६/४१/१६-१७, दिनांक २.०५.२०१६.

**प्रस्तावना :**

शासन निर्णय दिनांक २२.०२.२००१ अन्वये वनोपजाच्या वाहतूकीकरिता वन विभागामार्फत वाहतूक परवाना शुल्काचे दर ठरवून देण्यात आले होते. सदर परवाना शुल्कात आवश्यक सुधारणा करण्यासंदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक २.०५.२०१६ च्या पत्रान्वये शासनास शिफारस केली आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या उपरोक्त पत्रान्वये केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने वनोपजाच्या वाहतूक परवाना शुल्कात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

शासन निर्णय क्रमांक टिआरएस-१०००/प्र.क्र.३३८/फ-३, दिनांक २२.०२.२००१ अन्वये ठरविण्यात आलेल्या वनोपजाच्या वाहतूक परवाना शुल्काच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे-

| अ.क्र. | वाहन | प्रती वाहन सुधारीत दर (रुपयांत) |
|---|---|---|
| १ | बैलगाडी | १०० |
| २ | रेल्वे वाधिणीशिवाय ट्रक वा अन्य वाहन (प्रती वाहन) | ५०० |
| ३ | रेल्वे वाधिणी (प्रती वैगन) | ५००० |
| ४ | महाराष्ट्र राज्यात बाहेरुन आयात केलेल्या मालाकरिता कंटेनरव्दारे वाहतूक केल्यास (प्रती कन्टेनर) | १०००० |

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ अनुसार वनोपजाच्या वाहतूक परवाना शुल्काची आकारणी उपरोक्त सुधारीत दराप्रमाणे **दिनांक १ सप्टेंबर, २०१६** पासून करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात.

**३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०८२४१७५९५८९९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3a3acfdb19b03628a399a9a8c3aed13feb739d7b8bfdb181d6ec461d4505a7e, cn=Virendra R Tiwari
Date: 2016.08.24 18:00:50 +05'30'

**( वीरेंद्र तिवारी )**
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**<u>प्रत :-</u>**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.
६) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव).
७) उप वनसंरक्षक (सर्व)
८) निवडनस्ती, कार्यासन (फ-३), म.व.व.वि., मंत्रालय, मुंबई-३२.